आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.elaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ९ वे ● अंक ४३ वा ● शनिवार दि. ०२ ऑगस्ट २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●





## राज्यातील शाळांमध्ये अन्न विषबाधा टाळण्यासाठी नवीन मानक कार्यपद्धती जाहीर

मुंबई, : राज्यात प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या खासगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळेमधील इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनाचा लाभ देण्यात येतो. या मध्यान्ह भोजनातून होणाऱ्या अन्न विषबाधेच्या घटनांना आळा घालण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने सविस्तर मानक कार्यपद्धती जारी केली आहे. या योजनेत विद्यार्थ्यांना पौष्टिक, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण आहार मिळावा यासाठी धान्य साठवण, स्वयंपाक, आहार वितरण आणि स्वच्छतेबाबत काटेकोर नियमावली निश्चित करण्यात आली आहे. धान्य व इतर घटकांची गुणवत्ता तपासणी, स्वयंपाकघराची स्वच्छता, आहाराची चव चाखणे, नोंदी ठेवणे, पाण्याची शुद्धता सुनिश्चित करणे, तसेच आहार नमुना २४ तास जतन करणे यांसारख्या उपाययोजना अनिवार्य करण्यात आल्या आहेत. मानक कार्यपद्धतीमध्ये शाळा व्यवस्थापन समित्या, मुख्याध्यापक, शिक्षक, स्वयंपाकी, मदतनीस, शिक्षणाधिकारी, आरोग्य विभाग व अन्न व औषध प्रशासन यांच्या जबाबदाऱ्यांचे स्पष्ट वर्णन करण्यात आले आहे. अन्न विषबाधेची घटना घडल्यास त्वरित वैद्यकीय मदत, नमुना तपासणी आणि दोषींवर कारवाईचे निर्देशही देण्यात आले आहेत. ही कार्यपद्धती तत्काळ अंमलात आणण्याचे आदेश देण्यात आले असून, उल्लंघन झाल्यास संबंधितांवर दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाईल, असे नमूद करण्यात आले आहे.

## राजधानीत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना जयंतीदिनी अभिवादन

नवी दिल्ली : संघर्ष हा माझा धर्म आहे या



विचारांचे प्रतिक, समाजक्रांतीचे प्रणेते आणि थोर साहित्यिक साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीदिनी सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार यांनी अण्णा भाऊ साठे विनम्र अभिवादन केले.

महाराष्ट्र सदनाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात सहायक लेखा अधिकारी निलेश केदारे यांच्यासह उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

महाराष्ट्र सदनाचे व्यवस्थापक प्रमोद कोलप्ते यांनी यावेळी अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य, सामाजिक कार्य आणि श्रमिकांसाठी केलेल्या योगदानाचा परिचय करून दिला. या कार्यक्रमास महाराष्ट्र सदन आणि महाराष्ट्र परिचय केंद्र येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने अभिवादन

लातूर –आपल्या लेखणीच्या माध्यमातून सामाजिक क्रांती घडवणारे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अग्रक्रमी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर



यांच्या १३४वी सार्वजनिक जयंती उत्सव समिती लातूर २०२५ च्या वतीने जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विश्र्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशील कुमार महादेव चिकटे,विनय जाकते,अभिषेक पतंगे,आकाश सरवदे, सिद्धांत चिकटे,राहूल कांबळे,वैभव गायकवाड,रितेश गायकवाडव,स्वप्निल कांबळे,लक्ष्मण अंकुशे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## स्वातंत्र्यदिनासंदर्भात संकल्पना पाठविण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नागरिकांना आवाहन

नवी दिल्ली : स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्र्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व नागरिकांना १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून होणाऱ्या भाषणाच्या



संदर्भात त्यांचे विचार आणि संकल्पना मांडण्याचे आवाहन केले आहे.

आपल्या एक्स पोस्टवरील संदेशात पंतप्रधान यांनी म्हटले आहे की, या वर्षीच्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने, मी माझ्या भारतीयांच्या संकल्पना जाणून घेण्यास उत्सुक आहे!

यावर्षीच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात आपणास कोणते विषय किंवा संकल्पना प्रतिबिंबित झालेल्या आवडतील यासाठी नागरिकांनी MyGov आणि NaMo App वरील खुल्या मंचावर आपले विचार व्यक्त करावेत, असे आवाहन त्यांनी केले आहे.

अधिक माहिती साठी https://www.mygov.in/group-issue/let-your-ideas-and-suggestions-be-part-pm-modis-independence-day-speech-२०२५/ या संकेतस्थळाला अवश्य भेट द्या.

## 'श्यामची आई'ला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार

नवी दिल्ली, : केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने आज ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार २०२३ ची घोषणा केली. यामध्ये सुजय डहाके दिग्दर्शित 'श्यामची आई' चित्रपटाला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट पुरस्कार जाहीर झाला




आहे. तर, आशिष बेंडे दिग्दर्शित मराठी चित्रपट 'आत्मपॅम्फलेट' तसेच 'नाळ २' चित्रपटाला स्वर्ण कमळ पुरस्कार घोषित झाला आहे.

सर्वोत्कृष्ट बाल कलाकार पुरस्कार जिप्सी या चित्रपटातील बाल कलाकार कबीर खंदारे तर त्रिशा ठोसर, श्रीनिवास पोकळे आणि भार्गव जगताप यांना संयुक्तपणे नाळ २ चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कार घोषित झाला आहे.

यावेळी ४० फीचर चित्रपट पुरस्कार, १५ नॉन–फीचर पुरस्कार आणि १ चित्रपटांवरील सर्वोत्कृष्ट लेखन पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. फीचर चित्रपट पुरस्कार निवडीच्या ज्युरीचे नेतृत्व आशुतोष गोवारीकर, नॉन–फीचर ज्युरीचे नेतृत्व पी. शेषाद्री आणि चित्रपटांवरील सर्वोत्कृष्ट लेखन ज्युरीचे नेतृत्व गोपाळकृष्ण पै यांनी केले. २०२३ **(पान ३ वर) ...**

## राज्य शासन एसटी महामंडळ आणि एसटी कामगारांच्या पाठिशी खंबीरपणे उभे - उपमुख्यमंत्री अजित पवार

पुणे, : एसटी महामंडळ आणि एसटी कामगारांचे मूलभूत



प्रश्र्न मार्गी लागले पाहिजेत अशी राज्य शासनाची भूमिका असून राज्य शासन एसटी कामगारांच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे महासचिव हनुमंत ताटे यांचा अमृतमहोत्सव सोहळा व त्यानिमित्त आयोजित कामगार परिषदेत ते बोलत होते. हडपसर येथील विठ्ठल तुपे नाट्यगृहात आयोजित या कार्यक्रमास उद्योगमंत्री उदय सामंत, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार चेतन तुपे, बापूसाहेब पठारे, ज्येष्ठ कामगार नेते बाबा आढाव, माजी आमदार रवींद्र धंगेकर, सुनील टिंगरे, म्हाडाचे माजी उपाध्यक्ष विजय कोलते, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे आदी यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, कोरोना कालावधीत एसटी कर्मचाऱ्यांच्या पगाराचा प्रश्र्न होता. तेव्हा राज्य शासनाने पुढाकार घेऊन वेतनाची आवश्यक ती तरतूद केली होती. राज्य शासन एसटी कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांच्या अडचणीच्या काळात मागे उभे राहते. सन १९४८ पासून एसटीचा प्रवास सुरू झाला असून 'गाव तेथे एसटी' या ब्रीदवाक्यानुसार सर्वसामान्य माणसाला प्रवासाची सेवा देत आहे. सेवा देत असताना एसटी लोकाभिमुख झाली पाहिजे. प्रवाशांनाही परवडणाऱ्या दरात सेवा देणे आवश्यक असून त्याबाबत कामगारांनीही पुढाकार घेतला पाहिजे. राज्यातील शहरांचा विस्तार झाल्यामुळे एसटीच्या मोक्याच्या ठिकाणी असलेल्या जागा शहराच्या मध्यवर्ती भागात आल्या आहेत. त्या ठिकाणी एसटी स्थानकांचा सार्वजनिक खासगी भागीदारी तत्त्वावर (पीपीपी) विकास करण्यासाठी कराराचा कालावधी ३०–३०–३० वर्षे असा वाढविण्याचे धोरण अंमलात आहे. तथापि, कमी कालावधीमुळे विकासक पुढे येत नसल्याने आता यात बदल करुन आधी ४९ व नंतर ४९ वर्षे असा ९८ वर्षापर्यंत करार वाढविण्याचे नवीन धोरण लवकरच राज्य शासन आणत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना चांगल्या मूलभूत सोयी सुविधा मिळतील, असेही ते म्हणाले.

सर्वसामान्यांना सेवा पुरवित असलेल्या एसटी बसेस चांगल्या असल्या पाहिजेत ही शासनाची भूमिका आहे. डिझेल इंधनावरील खर्च वाचविण्यासाठी ईलेक्ट्रिक बसेसलाही (ईव्ही) प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. त्यासाठी केंद्र सरकार मोठ्या प्रमाणात अनुदान देत असून राज्य शासनही प्रयत्न करत आहे, असेही ते म्हणाले. कामगार संघटनेचे महासचिव हनुमंत ताटे यांनी इंदापूर तालुक्यातील एका सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येऊन एसटीत कारकुनाची नोकरी पत्करल्यानंतर कामगारांच्या प्रश्र्नांसाठी संघटनेत प्रवेश केला आणि डेपो सचिव, विभाग सचिव, प्रादेशिक उपाध्यक्ष ते महासचिव या पदापर्यंत मोठी वाटचाल केली. महामंडळावर दोन वेळा कामगार प्रतिनिधी म्हणून काम केले. त्यांनी कामगारांच्या प्रश्र्नांसाठी सतत पुढाकार घेतला, अशा शब्दात उपमुख्यमंत्री पवार यांनी त्यांचा गौरव केला.

उद्योगमंत्री सामंत म्हणाले, एसटी महामंडळाचे कर्मचारी मागण्यांसाठी संप करतात तेव्हा ते प्रवाशांचाही विचार करतात. पाच वर्षापूर्वी त्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने राज्यशासनाने सकारात्मक निर्णय घेऊन ६ हजार ५०० रुपयांची वाढ केली. कामगारांना देशात सर्वाधिक वेतन देणारे आपले एसटी महामंडळ आहे. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने एसटी स्थानकांच्या विकासासाठी ६०० कोटी रुपये दिले असून त्यातून विविध थांब्यांचा विकास करण्यात येत आहे. राज्यातील सर्व जिल्ह्याच्या ठिकाणची स्थानके बस पोर्टल म्हणून विकसित होणे गरजेचे आहे. स्थानकांवर चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी एसटी कामगार आग्रही असले पाहिजेत, असेही ते म्हणाले.

# पुणे शहराची नवीन क्षेत्रात पदार्पण करुन सामर्थ्य निर्माण करण्याची क्षमता - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पुणे, : कोणत्याही एका शहराने एखाद्या क्षेत्रावर वर्चस्व गाजविण्यासारखी स्थिती आता राहिली नसून महाराष्ट्रातील अनेक शहरे गतीने विकास करत आहेत. मात्र, पुणे शहर प्रचंड प्रगतशील आणि नाविन्यतेचे केंद्र असून नवीन क्षेत्रात पदार्पण करून आपले सामर्थ्य निर्माण करण्याची या शहरात क्षमता आहे. भविष्यात पुणे निश्र्चितच भरारी घेईल आणि त्यासाठी ग्रोथ हबच्या माध्यमातून तयार होणारा विकास आरखडा महत्वपूर्ण ठरेल, असा विश्र्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.




नीती आयोग, महाराष्ट्र शासन आणि पुणे इंटरनॅशनल सेंटरच्या संयुक्त विद्यमाने यशदा येथे आयोजित 'पुणे मेट्रोपॉलिटन रिजन ग्रोथ हब'च्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रह्मण्यम, पुणे इंटरनॅशनल सेंटरचे प्रमुख पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'पुणे मेट्रोपॉलिटन रिजन ग्रोथ हब'ला गती देण्याचे काम नीती आयोग करणार आहे. याबाबतचा आराखडा महाराष्ट्र शासन पीएमआरडीए करणार असून त्याला पुणे इंटरनॅशनल सेंटर मदत करणार आहे. नियोजित पद्धतीने विकास केल्यास जीवनशैलीतील सुलभताही साध्य करता येऊ शकते. आज ६५ टक्के जीडीपी शहरांच्या आजूबाजूच्या परिसरातून येतो. योग्य नियोजनातून ही वाढ गतिमान करता येऊ शकते. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ तयार केल्याने चांगली परिसंस्था निर्माण झाली. मात्र यापेक्षाही चांगल्या प्रकारची औद्योगिक विकासाची परिसंस्था तयार केल्यास त्याचा अधिक मोठा परिणाम होईल. आर्थिक वाढीतूनच चांगले सामाजिक वातावरण निर्माण होऊ शकते, असेही मत त्यांनी मांडले.

### उद्योगांसाठी मनुष्यबळ विकसीत करण्यावर भर

केंद्र सरकारने विदेशातील विद्यापीठांना त्यांचे भारतात कॅम्पस उभे करण्यासाठी व्यवस्था करण्याचा निर्णय घेतला. त्याचा लाभ घेत राज्य शासनाने संघटित पद्धतीने नवी मुंबईत 'एड्युसिटी' तयार करण्याचा निर्णय घेतला. येथे पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी राज्यशासनाने युनिकॉर्न स्टार्टअपला संधी दिली. आता या ठिकाणी जगातील ५ नामांकित विद्यापीठांनी आपल्यासोबत सामंजस्य करार केला असून १० विद्यापीठे येथे येतील. पुढील ४–५ वर्षात किमान ५० हजार विद्यार्थी येथे शिकतील. त्यातून केवळ जीएसटीचे २ हजार कोटी रुपयांचे उत्पन्न मिळेल. त्याहून महत्त्वाचे म्हणजे मोठ्या प्रमाणात उद्योगांसाठीचे मनुष्यबळ **(पान ३ वर)...**

# जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांचे हस्ते मुंबई उपनगर जिल्ह्यात महसूल सप्ताहाचा आरंभ

मुंबई, : शासनाबद्दल आणि शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्र्वास वृध्दींगत व्हावा, यासाठी विशेष मोहिम व लोकाभिमुख उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे सूचनांनुसार १ ऑगस्ट, 'महसूल दिनापासून मुंबई उपनगर जिल्ह्यात महसूल सप्ताहाचा आरंभ जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांचे हस्ते झाला. मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ड.आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी महसूल दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविक तहसिलदार युवराज बांगर यांनी केले. मुंबई उपनगर जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्य केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचा यावेळी गुणगौरव करण्यात आला.

जिल्हाधिकारी कटियार यांनी महसूल विभागातील उत्कृष्ट कार्य केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले. निवासी उपजिल्हाधिकारी सतिश बागल, उपविभागीय अधिकारी कल्पना गोडे, तहसिलदार युवराज बांगर, अजय पाटील, राजेंद्र चव्हाण व जिल्ह्यातील उत्कृष्ट कार्य केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना पुरस्कार वितरित केले.




नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा व शासनाच्या योजना त्यांच्यापर्यंत जलद गतीने पोहोचविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कटियार यांनी दिले. मुंबई उपनगर जिल्ह्यात महसूल सप्ताह अंतर्गत दि. १ ते ७ ऑगस्ट दरम्यान महसूल दिनी महसूल अधिकारी व कर्मचारी गुणगौरव, फेरफार नोंदीसाठी कॅम्प राबविणे, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत प्रत्येक तालुकानिहाय विविध दाखले देण्याची मोहीम राबविणे. विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करुन डीबीटी करुन अनुदानाचे वाटप करणे. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करणे तसेच शर्तभंग झालेल्या जमिनीबाबत शासन धोरणानुसार कार्यवाही करणे. च–ड्रपव धोरणाची अंमलबजावणी करणे हे कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी कटियार यांनी सांगितले.

अपर जिल्हाधिकारी मनोज गोहाड म्हणाले, बदलत्या काळानुरुप अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. महसूल अधिकारी व कर्मचारी यांनी जनतेशी सकारात्मक संवाद साधण्याचे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज साळुंके, मधुरा साडविलकर यांनी केले. तर आभार नायब तहसिलदार पुरुषोत्तम थोरात यांनी मानले. यावेळी उपजिल्हाधिकारी सुभाष काकडे, भागवत गावंडे व जिल्हयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मुंबई उपनगर जिल्हा ग्राम महसूल अधिकारी संघटनेचे अध्यक्ष संजय सोनंदकर व कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष बाळा मोरे यांचा सत्कार करण्यात आला.

महसूल दिनानिमित्त विभागीय आयुक्त कोकण विभागातून उत्कृष्ट अपर जिल्हाधिकारी मनोज गोहाड व नायब तहसिलदार (जमीन) पुरुषोत्तम थोरात यांना अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे व विभागीय आयुक्त कोकण विभाग डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या हस्ते कोकण विभागस्तरीय कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.

## साहित्यरत्न अण्णाभाऊ आणि लोकमान्य टिळक यांना भाजप नेते आ. कराड याच्याकडून विनम्र अभिवादन

लातूर – स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच अशी घोषणा देणारे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे अग्रगण्य नेते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त



आणि आपल्या साहित्यातून समाजाला दिशा देणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी या दोन्ही थोर महापुरुषांना पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले. लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात महान स्वातंत्र्यसेनानी, उत्कृष्ट वक्ते, उत्तम समाजसुधारक, पत्रकार, लेखक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी आणि आपल्या लेखणीतून कष्टकरी, उपेक्षित वर्गाच्या वेदना जगासमोर मांडणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी पुष्पांजली अर्पण करून साजरी करण्यात आली यावेळी भाजपाचे किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रम काका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले यांच्यासह मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, शरद दरेकर, सतीश आंबेकर, अनंत चव्हाण, दशरथ सरवदे,व इतर अनेकजण होते.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.elaturprabhat.in

# लोकशाहीत हूकूमी न्यायस्फोट ?

## संपादकीय...

न्यायदेवता आंधळी असते पण न्यायाला प्रकाशमय करते सत्य, असत्याचा साक्षमोक्ष करवून घेवूनच गुन्हेगाराना शिक्षा ठोठावते अशी लोकशाही जनाची भावना आहे, असते. परंतू नाशीक जिल्ह्यातील मालेगांव येथील ८ सप्टेंबर २००६ मधील बाम्बेस्फोट खटल्यातील सर्व आरोपी २०१६ मध्ये निर्दोष सुटले तर २९ सप्टेंबर २००८ मधील बाम्बस्फोट प्रकरणातील हिंदूत्ववादी संघटनाशी संबंधीत तमाम आरोपी कालच्या निकालात निर्दोष ठरले आणी लोकशाही न्यायसंस्थेतलच हूकूमी न्यायस्फोट होऊन न्यायसंस्थेवरच काळीपट्टी बांधली गेली की काय अशी प्रतिक्रिया तो निकाल नाचणारे चौका, चौकातील बिगारी कामगारात उमटताना दिसते आहे.

२६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील हूताम्मा अधिकारी हेमंत करकरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, कर्नल प्रसाद पूरोहीत, निवृत पेजर रमेश उपाध्यय, अजय राहीकर, समिर कूलकर्णी, सुधाकर चूतूर्वेदी, सुधाकर द्विवेदी वगैरेना अटक करुन दोषारोप दाखल केले होते पण तपास, चौकशी न्यायालयीन साक्ष, साक्ष पुरावे यंत्रणेने कमकूवत अहवाल तयार केला असावा, साक्षीपूरावे तकलादू असावेत तो तपास एसआयटीकडे असतानाही गुन्हा घडलेले ठिकाण, वस्तू सामूग्री घातक वस्तू, पदार्थ वगैरे बाबतीत सत्यता, स्पष्ठता निरपेक्षता दिसत नाही म्हणून विद्यमान न्यायालयाने त्यांची निर्दोष सूटका केली हा निकाल मान्यच, पण तो निकाल बऱ्याच कालावधी लोटल्यानंतरच दिला गेला. कॉग्रेस राजवटीवर बोट ठेवले जाते म्हणजे विद्यमान राजवअ खरी, न्यायीक आणी तत्कालीन राजवट दोषी असे, कसे म्हणता येईल अशीच कुजबूज राजकीय वर्तूळात होत असून सर्वकांही ठरवून तर नसेल मग लोकशाही न्याय संस्थेत हूकूमी न्यायस्फोट कसा काय होतो, गूजरात मधील गोध्रा हत्याकांडीत आरोपीही सहिसलामत कसे काय सूटतात, अशीच शंका, कूशंका चर्चिला जात असून सरकारी वकील आणी आरोपीचे वकील हे कोणाची, कोणासाठी बाजू मांडतात आणी न्यायालय कोणाला, कोणत्या पूराव्याला, साक्षीला सत्य ठरवून की वास्तव दर्शनी घडलेल्या प्रकाराला सत्य ठरवून निकाल देते हा विषय न्याय संस्थेचा आहे त्यात कोणी ही हस्तक्षेप करु शकत नाही पण जसे मागच्या एका निकालात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यानी सवोच्च न्यायालयात दाद मागणार असे स्पष्ट केले तसेच झालेही परंतू २९/०८ च्या निकाला संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच मालेगांव बाम्बस्फोट प्रकरणी मागील युपीए सरकारने भगव्या दहशतवादाचा खोटा नरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला होता पण तमाम आरोप निर्दोष सूटले, युपीए सरकारचा हिंदू समाजाला अवमानीत करण्याचा कट उघडा पडला कॉग्रेसन संपूर्ण हिंदू समाजाची माफी मागीतली पाहीजे असा राजकीय प्रस्ताव जाहीर `ल्याने ठरवूनच लोकशाही राज्यात न्याय संस्थेकडूनच हूकूमी न्यायाचास्फोट घडविला गेला की काय अशी जी सुशिक्षीत, बेकार विगारी काम करणाऱ्याच्या तोंडून तसे संवाद ऐकण्यास मिळत असतील तर घातकी, दहशतवादी हल्ल्याला कोण कसे रोखणार ? भगवा दहशतवाद, निला, पांढरा, हिरवा, केसरी, काळा, पिवळा, दहशतवाद निर्माण झालातर काय ? शहरी दहशतववाद, ग्रामीण दहशतवाद, नक्षलवाद वगैरे हे सत्तादारी पक्षाचे, सरकारचे भूत सर्व सामान्य जनतेच्या हिताचे नाही, हे असले दहशतवाद सत्ताधारी पक्षाचे लोक, सरकारी यंत्रणेच्या माध्यमातून पोसत असतील तर उद्याचा काळ कोणाच्या मालकीचा ...?

## तंत्रज्ञानाचा दुरुपयोग

सध्याचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट आज जीवनावश्यक गरज बनली आहे. आजच्या या इंटरनेट युगात सोशल मीडिया हा परवलीचा शब्द बनला आहे. सोशल मीडियाचा वापर करत नाही असा व्यक्ती आज शोधूनही सापडणार नाही. लहानांपूसून थोरांपर्यंत, गरिबांपासून श्रीमंतापर्यंत, सर्वसामान्यांपासून सिलेब्रेटिंपर्यंत सर्वचजण सोशल मीडियाचा वापर करतात मात्र आज हाच सोशल मीडिया सीलेब्रेटिंसाठी डोकेदुखी बनत आहे.

सोशल मीडियाचा वापर करून विविध प्रकारच्या अफवा पसरवल्या जातात हे तर आपल्याला माहीतच आहे. कधी सिलेब्रेटिंच्या निधनाच्या अफवा पसरवल्या जातात तर कधी सिलेब्रेटिंचे फोटो मोर्फ करून त्यांची बदनामी केली जाते तर कधी विविध प्रकारचे मिम्स बनवून त्यांची टर उडवली जाते. आता तर एआयच्या मदतीने सिलेब्रेटिंचे थेट डीपफेक व्हिडिओ बनवून त्यांना बदनाम केले जात आहे. मागील वर्षी बॉलिवूडची नवोदित पण लोकप्रिय अभिनेत्री असलेली रश्मीका मंधना हीचा असाच एक डीपफेक व्हिडिओ प्रसार माध्यमात व्हायरल करण्यात आला होता. सोशल मीडियावर हा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर कला क्षेत्रात चांगलीच खळबळ माजली होती. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर स्वतः अभिनेत्री रश्मीका हिने हा व्हिडिओ तिचा नसल्याचे सांगून व्हिडिओ व्हायरल झाल्यापासून तिला मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे सांगितले. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर बिग बी अमिताभ बच्चन यांनीही संताप व्यक्त केला होता. केवळ याच अभिनेत्रीचे नाही तर हिच्यासारख्या अनेक अभिनेत्रीचे असे मॉर्फ केलेले व्हिडिओ सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहेत.

केवळ बॉलिवूडच्या अभिनेत्रींचेच नाही तर भारतीय क्रिकेट संघातील महत्वाच्या आणि मोठ्या खेळाडूंचेही अभिनेत्रींसोबतचे मॉर्फ व्हिडिओ सोशल मिडियावर फिरत आहेत. सोशल मीडियावर व्हायरल झालेले हे व्हिडिओ एडिटिंग केलेले असतात. मूळ चेहरा लपवून त्याजागी सिलेब्रिटींचा चेहरा लावण्यात येतो. हे व्हिडिओ एडिटिंग करताना एआय या नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येतो. डीपफेक हा शब्द डीप लर्निंगमधून घेण्यात आला असून तो एक शिकण्याच्याच प्रकार आहे. या शब्दात डीप हा शब्द असल्याने या शब्दाला अनेक पदर आहेत. डीप लर्निंग हे कृत्रिम न्युरल नेटवर्कवर आधारित आहे. या अल्गोरिदममध्ये बनावट साहित्य आणि भरपूर डेटा प्रविष्ट करून त्याचे एका विशिष्ट सामुग्रिमध्ये रुपांतरीत केली जाते. जी माणसे तंत्रज्ञानाचा चुकीचा वापर करतात अशी माणसं बदला घेण्यासाठी डीप फेकचा वापर करतात. एआयच्या मदतीने व्हिडिओ आणि फोटो एडिट करून लोकांना त्रास दिला जातो. इथे मात्र बदला घेण्यासाठी नाही तर बदनामी करण्यासाठी याचा वापर केला गेला.

तंत्रज्ञानाने मानवी जीवनात क्रांती केली आहे. विज्ञानाच्या मदतीने दररोज नवे तंत्रज्ञान उदयास येत आहे. या तंत्रज्ञानाचा वापर मानवी कल्याणासाठी केला पाहिजे. विज्ञान तंत्रज्ञानाचा हेतू मानवी कल्याण हेच आहे मात्र काही नतद्रष्ट लोक या तंत्रज्ञानाचा उपयोग मानवी कल्याणासाठी नाही तर समाज विघातक कार्यासाठी करतात हा प्रकार त्यातलाच आहे. वास्तविक कोणाचाही असा फेक व्हिडिओ बनवून बदनामी करणे हा गुन्हा आहे. अशा समाज विघातक लोकांना कायद्याने कडक शिक्षा व्हायलाच हवी. तंत्रज्ञानाचा दुरुपयोग ही नवीच समस्या आता निर्माण झाली आहे. तंत्रज्ञानाचा असा दुरुपयोग करून कोणाचीही सहज बदनामी करता येत असल्यानेच अमिताभ बच्चन यांनी सोशल मीडिया वापरावा की नाही असा प्रश्न विचारला आहे. केवळ सिलेब्रेटिंच्या जीवनातच नव्हे सर्वसामान्यांच्या जीवनातही अशाप्रकारे तंत्रज्ञानाचा वापर कोणी केला तर त्यांचे आयुष्यच उध्वस्त होते म्हणूनच अशाप्रकारे तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करणाऱ्या नतद्रष्टांना शिक्षा झालीच पाहिजे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांत ओबीसींचे गुरु कोण?

लोकसभा विधानसभेत देशातील ५२ टक्के ओबीसींचे पानिपत झाले.आता उरल्या सुटल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका बाकी आहेत.या निवडणुकांत आपले अस्तित्व ओबीसी राखतील का? यात ते हरले तर त्यांची घरे गावठाणे रोजी,रोटी धोक्यात आहे. पानिपतची लढाई आम्ही देशासाठी लढलो.असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अभिमानाने सांगत आहेत.पेशवाई बद्दल महात्मा जोतिबा फुले,राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे सारे सांगतात.शूद्र ओबीसींना गुलाम करणारी,मनुस्मृती नुसार विषमतावादी असलेली,ही अत्यंत क्रूर शोषक शासन व्यवस्था स्त्रीशुद्राती शूद्रांच्या विरोधी होती.भारतीय संविधानाच्या माध्यमातून धार्मिक विषमतेच्या विरोधात सुरू असलेली लढाई आज आम्ही हरलो आहोत.पुन्हा पेशवाई महाराष्ट्रात सुरू आहे.महाराष्ट्रात घडणाऱ्या सामाजिक आर्थिक राजकीय.शोषणाच्या सर्व घटना आम्हा ओबीसी विरोधात आहेत.त्यांचा उल्लेख किती करायचा?आमचे अनेक लोक आज हिंदुत्वाच्या फडणवीस,पवार, शिंदे गटात आनंदाने जगत आहेत.मग गुलामी आहे कुठे ? असा प्रश्न सामान्य ओबीसी कार्यकर्त्यांना पडत असेल.

वर्तमान काळात ओबीसी शिक्षण,आरक्षण,घरे गावठाणे उद्योग,व्यवसाय,धोक्यात आहेत.हा माझा प्रत्यक्ष अनुभव आहे.ब्राह्मण क्षत्रिय वैश्य यांच्या अन्याय अत्याचारा बद्दल मी अधिक बोलावे,असे मला वाटत नाही.ओबीसी जागृतीचे अनेक प्रबोधनकार आपल्याकडे झाले आहेत.तरीही ओबीसींची मानसिक गुलामी हीच त्यांच्या शोषणास खरे कारण आहे.भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात प्रथम परकियाना हटवावे की देशातील हिंदू ब्राह्मणी धर्माने लादलेल्या विषमते विरोधात लढावे? असा वाद तत्कालीन नेतृत्वात होता.

ओबीसी जातींनी आज जी काही प्रगती साधली आहे ती भारतीय संविधानाच्या माध्यमातून,समतेच्या तत्वाने मिळविलेले यश आहे.या यशाला हिंदू धर्मगुरु पुरोहित,बुवा बापू,ज्योतिषी,पवार फडणवीस शिंदे या सत्ताधारी राजकीय गुरूंचे यश आहे?. असे आमच्यातील ओबीसी कार्यकर्त्यांचे




म्हणणे असू शकते?. निवडणुकांचा फॉर्म काळजी पूर्वक भरण्या ऐवजी ग्रह तारे ज्योतिष,तथाकथित गुरु,गंडे दोरे,भस्म यावर त्याचा अधिक भर असतो.मुहूर्त पाहिले जातात.तरीही पराभव होतो.म्हणून या धार्मिक कार्ये,पूजा,पुजारी नवस याविरोधात कुणाचीही तक्रार नसते.समुद्रात बुडालेली नौका सत्य नारायण पूजेने वर येते?.कालच रायगड उरणच्या परिसरात आगरी कोळ्यांच्या दोन मासेमारी नौका आणि खलाशी बुडाले.बुडालेल्या नौका आणि गेलेले जीव पुन्हा कुणी देव,गुरू,पूजा नवस आणून देऊ शकतो का?

लोकसभा विधानसभेत साऱ्या प्रमुख उच्चजातीच्या पक्षांनी ओबीसींना प्रथम तिकिटे नाकारली.जे सर्व संघर्ष करून लढले. त्यांच्या पराभवाची सर्व मानवनिर्मित व्यवस्था काळजी पूर्वक करूनच निवडणुका जिंकल्या गेल्या.यात नोटबंदी ही आर्थिक नाकेबंदी होती.निवडणूक आयोग,पोलिस,ईडी,यांचा उपयोग म्हणजे आधुनिक मनुस्मृतीचे भ्रष्ट रूप होते.आम्ही भ्रष्टाचारा विरोधी आहोत.असे सांगून त्याचे जागतिक विक्रम सत्ताधारी लोकांनी केले.या साऱ्या प्रकारात ओबीसी निवडून येणार कसे?.राजकीय जीवनात ओबीसींना यशस्वी व्हायचे असेल?.तर सामाजिक आर्थिक समतेची लढाई अगोदर लढावी लागेल. हे आमचे नेते संविधानकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर सागून गेले.

याच मार्गाने रायगड कोकणात कुळ कायद्यासाठी नारायण नागू पाटील लढले. सेझ विरोधी ड.दत्ता पाटील लढले. सिडको विरोधात लोकनेते दि.बा.पाटील साहेब लढले.या मार्गावर तुमच्यासह अनेक कार्यकर्ते लढत आहेत.आज स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये निवडणुका लढण्यासाठी पैसे ओबीसी उमेदवारांकडे नाहीत.या स्थितीस स्वातंत्र्य पूर्व काळातील पेशवाई मनुस्मृतीच्या धार्मिक विषमतेची उपमा योग्य होईल.शूद्रांच्या वाईट स्थितीस त्यांच्या पूर्व जन्मातील पाप कारणीभूत आहे. असे उत्तर ब्राह्मण क्षत्रिय वैश्य देतात.अर्थात या सर्व खोट्या गोष्टींची धर्म चिकित्सा बुद्ध,चार्वाक,महावीर आणि फुले शाहू आंबेडकर यांनी केली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकीय आरक्षण आपल्या संविधानाने दिले आहे.ही गोष्ट हिंदू धर्म प्रमुखांना मान्य नाहीच.म्हणूनच महानगर पालिकेत निवडणूकच होऊ नये? याची काळजी घेतली गेली.महानगर पालिकेत निवडून आलेले नगरसेवक नसताना, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून प्रचंड लूट,नगरविकास खाते करते.याबद्दल साऱ्या महाराष्ट्रात वनमंत्री गणेश नाईक हे आगरी ओबीसी राजकीय नेते प्रचंड आक्रोश करत आहेत.तरीही महाराष्ट्रातील अनेक ओबीसी नगरसेवकांना हा राजकीय नेतृत्वाचा हक्क नाकारणारा,एकलव्यासारखा अंगठा कापण्याचा ब्राह्मण क्षत्रिय वैश्य राजगुरूंचा निर्णय समजलेला नाही.

आम्हाला राजकीय सत्ता नाकारली म्हणजेच आम्ही शूद्र ठरलो.सरकारी नोकऱ्या, शिक्षण,जमिनी पाणी,जंगल मानवी अधिकार,धार्मिक हक्क या सर्व बाबतीत घडले.

यासाठी देव,धर्म,धर्मग्रंथ,आडवे आले.ते अनेक शूद्र अतिशूद्र लोकांनी नाकारले.यातील मनुस्मृती विरोधी लोक हेच आमचे खरे गुरू आहेत.त्यांनी केलेला धार्मिक, आर्थिक,राजकीय संघर्ष,हा आमच्या राजकीय संघर्षाचा आधार आहे.तत्वज्ञान आहे.हा विषय समजून न घेतल्यास ओबीसी नगर सेवकांची राजकीय गुलामी निश्रिचत आहे.

जय ओबीसी.जय दिबा. जय एकवीरा.

**राजाराम पाटील.८२८६०३१४६३.उरण ,जिल्हा रायगड.**

## झरोका

एक – मंत्री कोकाटेसह इतर मंत्री व आमदाराना मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री मिळून त्यांच्याहाती नासके नारळ देतील अशी लोकभावना होती पण तसे काही घडलेच नाही तंबी दिली, खाते बदलले म्हणजे काय सत्तापद आहेच मग यातून जनतेने काय बोध घ्यावा हेच कळत नाही. सत्ताधारीच नालायक, भांडखोर, वाचळवीर असतील तर जनतेने काय अपेक्षा करावी हेच कळत नाही. डोकं बधीर झालंय.

दुसरा – अरे, मंत्रीपद काढून घेण्याइतपत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात दम नाही परंतू उपमूख्यमंत्री अजितदादा तसे करु शकतता, एकनाथ शिंदे कठोर निर्णय घेवू शकतात असे लोकाना वाटत होते पण यापुढे असे चालणार, खपवून घेणार नाही, म्हणून आमदाराना तंबी आणी मंत्र्याना मलदू ऐवजी दुग्धासराचे खाते यामूळे काय फरक पडतो, सारे हात तूप, मलईच्या आर्थीक वर्षाने बरबटलेले आहेतच, तसेच राहीतील, तू कशाला काळजी करतो आहेस.

एक – अहो, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस निर्णायक भूमिका घेतात, अजित दादा फटकळ पण तात्काळ निर्णय घेणारे म्हणून ओळखले जातात, एकनाथराव शिंदे हे न बोलताच काय ते करतात म्हणून कोकाटे, सिरसाठ, गायकवाड, पडळकर कदम वगैरेना चाप लावतील असे वाटत होते म्हणूनच बोलतोय.

दुसरा – अरे, विद्यमान फडणवीस सरकार हे तीन ठिगळाचे सरकार आहे. सोबतीला कूबड्याही आहेतच सत्ता हे एक नाक, चाक असले तरी नाकाला मेकूड, शेंबूड, आणी शेंबडासाठी माशीही महत्वाचे असते तर चाकाला ही नळे, तेल असावेच लागते म्हणून कोणी कोणाला डवचू, रोखू शकत नाही अन्यथा सत्तेचे नाक आणी चाक ही जाते आणी राहातो फक्त सांगाडा तेच फडणवीस याना सोसत नाही, मग कोकाटेच्या रमी पत्यात हूकूमी पत्ता कोकाटे, सिरसाट, कदम असतील तर जोखीम कोण घेणार म्हणून तसे घडले असावे एवढेच.

## काय बोलता राव ?

कोणा एका व्यक्तीची किंवा संस्थेची मनमानी चालता कामा नये म्हणूनच न्यायपालिका, कार्यपालिका स्वतंत्र असल्यापाहिजेत, न्याय संस्थेचे राजकीयीकरण त्याप्रमाणेच राजकाणाचे न्यायीकिरण याविरुध्द न्यायालये व कर्णपालीकेतील अर्थात सरकारातील जबाबदार सदस्य, लोकप्रतिनिधीनी अशा मनमानी एकाकी नेतृत्वाविरुध्द उभे राहीले पाहीजे असे स्पष्ट प्रतिपादन माजी केंद्रीय विधी व न्यायमंत्री अश्वनी कूमार यानी केल्याने डोळं दीपकत आहेत, भुवया उंचावत आहेत तेच काय ते कळत नाही.

### काय बोलता राव !

अरे, एकहाती सरकार, विधानसभा विधान परिषद अध्यक्ष, सभापतीवर अंकूश, एकला चलो रे असा कारभार यामूळे विधानसभा, विधान परिषदेत पारीत झालेले प्रस्ताव, ठराव तसेच रेंगाळत ठेवल्याने राज्य सरकार विरुध्द कर्नाटक राज्यपाल यांच्यातील खटल्यात न्यायालयाने दिलेल्या निकालावर राष्ट्रपती मागविलेल्या मतावर सर्वोच्च न्यायालयात सूनावणी, त्यावर राज्यकर्त्याचा हस्तक्षेप, राज्यपाल व विधानसभा अध्यक्षाचे मत यावर सर्वोच्च, न्यायालयाने दिलेला निर्वाळा हा महत्वाचा ठरला. कर्नाटकातील पेच सूटला तिच स्थिती महाराष्ट्रात आजही पक्षांतर, पळवापळवी, पक्षातील फूटप्रकरण, विधानसभा अध्यक्ष निवडणूक वगैरे हा कोणा एकाचीच मनमानी असल्याने घडते आहेत, म्हणूनच अशा या न्यायपालीका, कार्यपालीका स्वतंत्र ठेवण्यासाठी, मनमानी रोखण्यासाठी सदस्यानी खंबीर उभे राहावे असे अश्वनी कूमार याना वाटते पंरतू मोदीजी, फडणवीस यांचे समोर सारे बैलच असतील तर ....? मग बोला दाजीबा !




# लोकशाहीरांच्या 'क्रांतीकारी' विचारांवर बसपा सत्तेत येईल-अॅड.सुनील डोंगरे

पुणे:– लोकशाहीरांच्या क्रांतीकारी, पुरोगामी विचारांवर चालत बहुजन समाज पक्ष आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसह इतर निवडणुकांमध्ये यश मिळवेल. 'सर्वजन सुखाय,सर्वजन हिताय' समाजव्यवस्थेसाठी बहुजनांची 'शासनकर्ती' जमात उभारण्याकरीता बसप प्रयत्नरत आहे. समाजाच्या व्यथा–व्यंगांना शब्दांनी जखमांसारखे भिडवणारे क्रांतीचे कवि अण्णाभाऊंच्या लोकसाहित्यातून पक्षाला प्रेरणा मिळते,असे प्रतिपादन पक्षाचे प्रदेशाध्यक्ष अॅड.सुनील डोंगरे यांनी केले.

अॅड.डोंगरे यांच्या हस्ते तसेच पक्षाचे राज्य प्रभारी रामचंद्रजी जाधव,प्रदेश महासचिव, पश्र्चिम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी डॉ.हुलगेश चलवादी यांच्या उपस्थितीत पुण्यातील येरवडा येथील अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवनात अण्णाभाऊंच्या पुतळ्याला पुष्पांजली



अर्पण करीत अभिवादन करण्यात आले.तदनंतर वाजत गाजत सारसबाग येथील अण्णाभाऊंच्या ऐतिहासिक पुतळ्याला पुष्पांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमात जिल्हाध्यक्ष अशोक गायकवाड, बामसेफ समन्वयक अशोक रामटेके, सागर जगताप, अनिल त्रिपाठी, परशुराम आरोने, राम डावकर, मनोज कसबे तसेच पुणे जिल्ह्यातील सर्व प्रभारी, विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष, प्रमुख पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. पुण्यातील कार्यक्रमानंतर पक्षाकडून काढण्यात आलेली रॅली लोकशाहीरांचे मुळगाव वाटेगाव येथे आयोजित राज्यस्तरीय अण्णाभाऊ साठे जयंती सोहळ्यासाठी रवाना झाली.

अण्णाभाऊंच्या 'जग बदल घालूनी घाव, सांगुनी गेले मला भीमराव' या ओळीप्रमाणे सध्यस्थितीत सामाजिक न्याय तसेच देश बदलण्यासाठी 'घाव' अर्थात वैचारिक क्रांती करावी लागेल.बहुजनांच्या एकजुटीने प्रस्थापितांना घरचा रस्ता दाखवला जावू शकतो. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत बहुजनांनी त्यामुळे हत्ती निवडणूक चिन्ह असलेल्या बसपाच्या निळ्या झेंड्याखाली एकत्रित यावे, असे आवाहन यानिमित्ताने डॉ.हुलगेश चलवादी यांनी केले. सामाजिक–राजकीय वैचारिक लढ्यातुन समाजबदलाची मुहूर्तमेढ रोवली जाईल,असा विश्र्वास त्यांनी त्यांनी व्यक्त केला.

''साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी त्यांच्या लेखणीतून बहुजनांना उच्च शिक्षण घेवून संघटीत होण्याचा संदेश दिला. अण्णांच्या क्रांतीकारी शब्दांनी बहुजनांमध्ये ऊर्जा निर्माण केली. आजही लोकशाहीरांचे क्रांतीकारी शब्द प्रेरणा देणारे आहेत.याच प्रेरणेतून बहुजनांनी आत्मप्रकाशित होत सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, साहित्यीक तसेच राजकीय प्रगती करावी.बहुजनांना मुख्यप्रवाहात आणण्यासाठीच बसपाचा जन्म झाला आहे.''

## साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे यांना शहर जिल्हा भाजपच्या वतीने अभिवादन

लातूर : साहित्यरत्न डॉ.



अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त लातूर शहर जिल्हा भाजपच्या वतीने सौ. अदिती अजित पाटील कव्हेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे यांच्यासह पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

साहित्यातून समाजप्रबोधन करणारे डॉ.अण्णाभाऊ साठे यांची आज १०५ वी जयंती आहे. डॉ. अण्णाभाऊ साठे यांनी शोषित, वंचित समाजघटक व कामगारांच्या कल्याणासाठी मोठे कार्य केले आहे. डॉ.अण्णाभाऊ साठे यांनी शाहिरीच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे काम केले आहे. त्यामुळेच त्यांची लोकशाहीर म्हणून सुद्धा ओळख आहे. डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शहर जिल्हा भाजपच्या वतीने शहरातील त्यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सौ.अदिती पाटील कव्हेकर, माजी शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे, माजी स्थायी समिती सभापती ॲड. शैलेश गोजमगुंडे, सरचिटणीस रवी सुडे, ॲड.दिग्विजय काथवटे, सौ मीना भोसले, माजी नगरसेवक मंगेश बिराजदार, सौ शोभा पाटील, अनंत गायकवाड, मंडल अध्यक्ष सुरेश जाधव, सौ निर्मला कांबळे, रोहित पाटील, विशाल हावा पाटील, काकासाहेब चौगुले, संयोजक ॲड. किशोर शिंदे, सहसंयोजक राजकुमार गोजमगुंडे, शिवसिंह सिसोदिया, प्रमोद गुडे, श्रीराम कुलकर्णी, सुरेश राठोड, रविशंकर केंद्रे, संजय गीर, गणेश हेड्डा, गणेश गवारे, ॲड. विजय आवचारे, रविशंकर लवटे, ॲड.गणेश गोजमगुंडे, अरुण जाधव, महादेव कानगुले, किशन बडगीरे, मुन्ना हाश्मी, अमोल गित्ते, धनंजय हाके, अर्चना आल्टे, सौ ज्योती रसाळ, सौ शीतल कुलकर्णी, शीतल पाटील, आफरीन खान, रोहिणी देशमुख, निखील गायकवाड, पवन आल्टे, अभिषेक सिरसाठ, संतोष इगवे, विनय जाकते, राजकुमार सोनवणे, अतिश कांबळे, गजेंद्र बोकन, शैलेश भडीकर, वैभव कांबळे, संदीप सोनवणे, भरत लोंढे, महेश झंवर, सागर घोडके, राजेश पवार, संतोष ठाकूर, आकाश खैरमोडे, उत्तम सुर्यवंशी, अभिजीत मुनाळे, सीमा करपे, शोभा कोंडेकर, शन्नू शेख, रत्नमाला घोडके, शामल खराडे, शामल गायकवाड, सुवर्णा येलाले, आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## 'श्यामची आई'ला सर्वोत्कृष्ट..

**(पान १ वरुन) :** वर्षामधील राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार फीचर, नॉन फीचर आणि चित्रपटांवरील सर्वोत्कृष्ट लेखन अशा तीन विभागांमध्ये जाहीर करण्यात आले. हे पुरस्कार लवकरच प्रदान केले जाणार आहेत.

हिंदी चित्रपट १२ वी फेलला सर्वोत्कृष्ट फीचर चित्रपट पुरस्कार जाहीर झाला. जवान चित्रपटासाठी शाहरुख खान आणि '१२ वी फेल'साठी विक्रांत मेस्सी यांना संयुक्तपणे 'सर्वोत्कृष्ट अभिनेता' पुरस्कार जाहीर झाला. राणी मुखर्जीला 'सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार' जाहीर करण्यात आला.

दिग्दर्शकाचा सर्वोत्कृष्ट पदार्पणाचा चित्रपट पुरस्कार दिग्दर्शक आशिष भेंडे यांना आत्मपॅम्फलेट या मराठी चित्रपटासाठी जाहीर करण्यात आला.

सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट – कटहल– अ जॅकफ्रुट मिसरी, सर्वोत्कृष्ट अभिनेता– शाहरुख खान आणि विक्रांत मेस्सी, सर्वोत्कृष्ट अभिनेत्री– राणी मुखर्जी, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक – सुदिप्तो सेन, द केरला स्टोरी, सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री – उर्वशी, उलोझुक्कु, सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता – विजयराघवन आणि मुथुपेट्टई सोमू भास्कर, राष्ट्रीय, सामाजिक आणि पर्यावरणीय मूल्यांना प्रोत्साहन देणारा सर्वोत्कृष्ट चित्रपट – सॅम बहादुर या चित्रपटास पुरस्कार घोषित करण्यात आला.

# पुणे शहराची नवीन क्षेत्रात पदार्पण करुन सामर्थ्य...

**(पान १ वरुन) :** निर्माण होईल. या विद्यापीठांमुळे एआयवर आधारित नवी क्रांती येईल. या संधीचा लाभ घेण्यासाठी जागतिक उद्योग या ठिकाणी येतील, असा विश्र्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

ग्रोथ हबच्या माध्यमातून पुण्याचे चित्र बदलणार

पुणे हे उत्पादन केंद्र आहे, त्यासोबत हे शहर पूर्वेचे ऑक्सफर्ड म्हणून गणले जाते. उत्कृष्ट शैक्षणिक संस्था असल्याने इथे चांगले मनुष्यबळ तयार होते. कुशल मनुष्यबळ असलेल्या ठिकाणी मोठी गुंतवणूक होते. एआयवर आधारित प्रगती साधण्यासाठी हे मनुष्यबळ महत्त्वाचे आहे. आज एआय तंत्रज्ञान सर्व क्षेत्रात बदल घडवत आहे. त्याचा लाभ घेऊन जीडीपीच्या वाढीला अधिक गती देता येऊ शकते. पुण्यात ज्या क्षेत्रांची क्षमता आहे त्या क्षेत्रांचे बदलते स्वरुप लक्षात घेवून नियोजन केले तर इथले दरडोई उत्पन्न वाढविता येईल. या प्रत्येक क्षेत्रासाठी आवश्यक धोरण, धोरणातील बदल, महत्वाचे क्षेत्र, त्यासाठीचा दृष्टीकोन, महत्वाच्या बाबी, पायाभूत सुविधा आदींचा विचार ग्रोथ हबच्या माध्यमातून होणार आहे. या माध्यमातून शहरासाठी महत्वाचा दस्तावेज तयार करण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

पुणे जिल्ह्यात होणाऱ्या नवीन विमानतळ आणि रिंग रोड या केवळ दोन बाबींमुळे ३ लाख कोटी रुपयांचा सकारात्मक परिणाम पुण्याच्या अर्थव्यवस्थेवर पहायला मिळेल. आता आपल्याला केवळ इतर शहरांशी नव्हे तर जगाशी स्पर्धा करून ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था करावी लागणार आहे. असे करताना शासन यंत्रणेतील अवरोध दूर करणे आवश्यक असून त्यावर भर देण्यात येत आहे. त्यासाठी शासन यंत्रणेतील सर्व विभागांना आपला सहभाग द्यावा लागणार असून धोरणे, धोरणांची अंमलबजावणी करण्याची मानसिकता बदलावी लागणार आहे. औद्योगिक क्षेत्रात त्रास देणारे घटक औद्योगिक क्षेत्राला, गुंतवणूकदारांना स्पर्धात्मक होऊ देत नाहीत या बाबीचाही आपल्याला विचार करावा लागेल.

शहराच्या विकासासाठी योग्य नियोजन आवश्यक– उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

पुणे शहरासाठी हा दिवस विकासाचे नवे पर्व घेऊन येणारा असल्याचे नमूद करून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, महाराष्ट्राच्या विकासाचे ध्येय आणि लोकाभिमुख कल्याणकारी योजनांची सांगड घालण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. परंपरा, पर्यावरण, प्रगती आणि पुणे हे चारही शब्द समानार्थी राहतील अशी पुण्याची वाटचाल राहील. देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर करण्याचा प्रधानमंत्री मोदी यांच्या नेतृत्वाखाली प्रयत्न सुरू आहे. आर्थिक विकास करताना काटेकोर नियोजन देखील आवश्यक असून शहराच्या विकासाचे योग्य नियोजन होणे गरजेचे आहे. यासाठी नीती आयोग राज्य शासनाला सहकार्य करीत आहे. या नियोजनाद्वारे शहरातील क्षमतांचा विकासासाठी उपयोग करून घेण्यात येणार आहे. ग्रोथ हब ही संकल्पना त्यासाठीच आहे. केंद्र सरकारने १४ ग्रोथ हबची सुरुवात करण्याचा निर्णय घेतला. यात मुंबईसोबत पुण्याचाही समावेश होत आहे.

उपमुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले, पुणे तंत्रज्ञान, उद्योग, उत्पादन, शिक्षण, आरोग्य सुविधा या क्षेत्रात आघाडीवर असून याबरोबरच पर्यटन क्षेत्रातही प्रचंड क्षमता आहे. म्हणून महानगर क्षेत्रात ग्रोथ हबची संकल्पना निश्र्चितपणे यशस्वी होईल. शहरांसोबत ग्रामीण भागाचा विकासाही होणे गरजेचे आहे. ग्रोथ हबच्या माध्यमातून शहराच्या विकासाचा लाभ ग्रामीण भागालाही होईल. विकासासाठी रस्त्यांची जोडणी आणि पायाभूत सुविधा निर्मिती महत्त्वाची आहे. मुंबई पुणे एक्सप्रेस हायवे मुळे ही दोन्ही शहरे आता जवळपास जोडशहरे झाली आहेत. पुण्यात माहिती तंत्रज्ञान, ईव्ही, सेमीकंडक्टर, एआय उद्योग आहेत. तसेच येथील शैक्षणिक सुविधांमुळे भारताचे कुशल मनुष्यबळ पुरवणारे केंद्र करण्याची क्षमता पुण्यात आहे आहे. पुणे मेट्रोपॉलिटन रिजन ग्रोथ हब हे पुणे परिसराला आंतरराष्ट्रीय शहर बनू शकेल असा विश्र्वासही, उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

सुब्रह्मण्यम यांनी सादरीकरणाद्वारे ग्रोथ हबची माहिती दिली. देशाची अर्थव्यवस्था सध्याच्या ३ ट्रिलियन डॉलर वरुन ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्यासाठी शहराच्या सुनियोजित विकासाची गरज आहे. ग्रोथ हबची सुरुवात मुंबई महानगरासह ४ शहरापासून झाली. ग्रोथ हबच्या माध्यमातून शहराच्या परिसरातील अर्थव्यवस्थेला चालना देण्यासोबत तेथील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यावर भर देण्यात येतो. भविष्यातील विकासाच्या क्षेत्रातील संधीचा अभ्यास करून भविष्यातील नियोजन करण्यात येते. त्यासाठी आवश्यक सुविधा निर्मितीवर भर देण्यात येतो, यासाठी सुयोग्य आराखडा तयार करण्यात येतो.

ग्रोथ हबच्या माध्यमातून मुंबई महानगर क्षेत्राची अर्थव्यवस्था सध्याच्या १४० अब्ज डॉलरवरून येत्या पाच वर्षात दुप्पट म्हणजेच ३०० अब्ज डॉलरची करण्याचे नियोजन आहे. पुण्याचीही सध्याची ५८ अब्ज डॉलरची अर्थव्यवस्था दुप्पट करण्याचे नियोजन आहे. त्यादृष्टीने पुढील ४–५ महिन्यात असा आराखडा तयार करण्यात येईल. पुण्यात उत्पादन केंद्र बनण्याची क्षमता आहे. वाहन उद्योग, माहिती तंत्रज्ञान, अभियांत्रिकी संशोधन, शैक्षणिक सुविधा, कृषी आधारित उद्योग, छोटे आणि मध्यम उद्योग आदी क्षेत्र अशी पुण्याची शक्तीस्थळे आहेत. पुण्याच्या आर्थिक वाढीचा दर १० टक्क्यापर्यंत नेण्याची आवश्यकता आहे. हे शहर जागतिक शहर बनावे यादृष्टीने चांगल्या आराखड्याद्वारे इथली अर्थव्यवस्था ६०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे लक्ष्य असले पाहिजे. भविष्यात पुणे जगातील अग्रणी शहर बनेल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

देवरा यांनी प्रस्ताविकात सांगितले, एमएमआर ग्रोथ हबनंतर पुणे महानगर क्षेत्र ग्रोथ हबची सुरुवात करण्यात येत आहे. अशाच प्रकारे नंतरच्या टप्प्यात नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक येथे ग्रोथ हबची सुरुवात करण्यात येणार आहे. राज्यात असे एकूण पाच ग्रोथ हब उभारण्यात येतील. पुण्यात मोठ्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध असून कुशल मनुष्यबळाच्या आधारे निर्यात वाढीसाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. स्थानिक संस्था, उद्योग आणि संघटनांनाही आराखडा बनविण्याच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्यात येणार आहे. त्यासाठी पुणे इंटरनॅशनल सेंटरशी सामंजस्य करार करण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी महाराष्ट्र शासन नीती आयोग आणि पुणे इंटरनॅशनल सेंटर यांच्यात पुणे मेट्रोपॉलिटन रिजन ग्रोथ हबच्या अनुषंगाने सामंजस्य करार करण्यात आला.

यावेळी आमदार योगेश टिळेकर, भीमराव तापकीर, राहूल कुल, सिद्धार्थ शिरोळे, शंकर जगताप, बापूसाहेब पठारे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चोबे, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त शेखर सिंह, पीएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदींसह उद्योग व्यवसाय क्षेत्रातील मान्यवर, पीएमआरडीएचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

'डेव्हलपिंग सिटी रिजन्स ज ग्रोथ हब' उपक्रमाविषयी:

नागरी प्रदेश हे गतिमान विकासाचे केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने नीती आयोगाने २०२३ मध्ये 'डेव्हलपिंग सिटी रिजन्स ज ग्रोथ हब' हा उपक्रम हाती घेतला. प्रायोगिक स्वरूपात मुंबई महानगर प्रदेश क्षेत्र (एमएमआर), सुरत वाराणसी आणि विशाखापट्टणम मध्ये हा उपक्रम राबवण्यात येत आहे. आता पुणे महानगर प्रदेश क्षेत्राचाही (पीएमआर) यात समावेश करण्यात आला आहे.

आर्थिक गतिमानता, जीवन शैलीतील सुधारणा, आणि शाश्र्वत कार्यपद्धतींना प्रोत्साहन देणे हे या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. आर्थिक विकास आराखड्याचा (इकॉनॉमिक मास्टर प्लॅन) इंडिया२०४७ शी समन्वय साधून एकात्मिक, भविष्यवेधी नागरी आराखड्याच्या दिशेने पाऊल टाकणारा हा देशातील पहिला महानगर प्रदेश आराखडा असणार आहे.

# 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमातून अपर मुख्य सचिव विकास खारगे यांची विशेष मुलाखत

मुंबई, : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' या कार्यक्रमात अपर मुख्य सचिव विकास खारगे यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे.

'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत सोमवार दि. ४, मंगळवार दि. ५, बुधवार दि. ६ आणि गुरूवार दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवर तसेच 'News On AIR' मोबाईल ॲपवर ऐकता येणार आहे. तर 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत दोन भागांमध्ये प्रसारित होणार असून, या मुलाखतीचा पहिला भाग मंगळवार, दि. ५ ऑगस्ट २०२५ रोजी व दुसरा भाग मंगळवार, दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री ८.०० वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून प्रसारित होणार आहे. तसेच ही मुलाखत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या खाली दिलेल्या अधिकृत समाजमाध्यमांवर देखील पाहता येणार आहे.

X (Twitter) : https://twitter.com/MahaDGIPR



Facebook : https://www.facebook.com/MahaDGIPR

YouTube : https://www.youtube.com/M-H-R-SHTR-DGIPR

ही मुलाखत प्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी घेतली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा मिळवून देण्यामागचा ऐतिहासिक प्रवास तत्कालीन सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव श्री. खारगे यांनी अत्यंत सुसंगतपणे मांडला आहे. या ऐतिहासिक निर्णयामागील राज्यशासनाची दूरदृष्टी, प्रभावी समन्वय, सांस्कृतिक जाणीव आणि वारसा संवर्धनातील बांधिलकी या पैलूंवर त्यांनी प्रकाश टाकला आहे. या अनुषंगाने राज्य शासनाचे नियोजन, प्रयत्न, समन्वय, धोरणात्मक निर्णय तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचे जागतिक स्तरावरील महत्त्व याविषयी 'दिलखुलास'व 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमातून अपर मुख्य सचिव श्री. खारगे यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोचा जागतिक वारसा दर्जा मिळवून देण्याच्या या प्रवासात संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, वन विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग व पुरातत्त्व विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचे मोलाचे योगदान लाभले आहे. हे यश या सर्व प्रक्रियेत संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून शक्य झाले असल्याचे अपर मुख्य सचिव श्री. खारगे यांनी 'दिलखुलास' व 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमातून सांगितले आहे.

# लातुरात भव्य प्रबोधन रॅलीने साहित्यरत्न अण्णाभाऊस अभिवादन

लातूर : लातूर येथील 'जी –२४ 'या सामाजिक संघटनेअंतर्गत स्थापन झालेल्या साहित्यारत्न आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती तसेच राष्ट्रसेवा दल व इतर पुरोगामी परिवर्तनवादी संघटनाच्या वतीने आज १ ऑगस्ट रोजी सकाळी साडे आठ वाजता लातूर शहरातुन भव्य प्रबोधन रॅली काढण्यात आली.



सदर रॅलीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून प्रारंभ करण्यात आला. या रॅलीमध्ये साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा आणि म.फुले, शाहू महाराज, डॉ.आंबेडकर, जयघोष करण्यात आला. रॅलीमध्ये सहभागी झालेल्या महिला पुरूषांच्या हातामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे फलक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.परिवर्तनवादी जोशपूर्ण घोषणा कार्यकर्त्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. महात्मा ज्योतीराव फुले यांच्या पुतळ्याला पुष्पाहार घालून ही रॅली महात्मा गांधी चौक मार्गे गांधीजींच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आणि त्यानंतर साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे चौक येथे पोहचली. या ठिकाणी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. आले.

सदर रॅलीमध्ये जिजाऊ ब्रिगेड, लसाकम, राष्ट्र सेवा दल, गुरु रविदास सत्यशोधक समाज, मागासवर्गीय अधिकारी कर्मचारी संघटना, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, भटक्या विमुक्त संघटना, अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटना आदी संघटनाचा समावेश होता. तर प्राचार्य सोमनाथ रोडे, प्राचार्य नागोराव कुंभार, प्राचार्य आर. डी. निटुरकर, प्रा. अनंत लांडगे, प्रा. सुधीर अनवले, जयंती समिती अध्यक्ष राजकुमार होळीकर, संयोजक नरसिंग घोडके, पांडुरंग देडे, यू डी गायकवाड, महानंदा शेवाळे, जयप्रकाश दगडे, डॉ. गणेश गोमारे, बी आर पाटील, प्रा. सुभाष भिंगे, कॉ. विश्र्वभर भोसले, ॲड. सोमेश्र्वर वाघमारे, अफजल कुरेशी, बरकत काझी, बी. बी. गायकवाड, आदी मान्यवर सहभागी होते

## इतिहासात आजचा दिवस २ ऑगस्ट २०२५

अंतरराष्ट्रीय

१७९० – अमेरिकेतील पहिली जनगणना सुरू.
१८६९ – जपानमधील वर्णसंस्थेचा शेवट.
१९१६ – पहिले महायुद्ध – इटलीची लिओनार्डो दा व्हिन्ची ही युद्धनौका बुडाली.
१९३४ – ॲडोल्फ हिटलर जर्मनीच्या फ्युररपदी.
१९४५ – दुसरे महायुद्ध – पॉट्सडॅम संमेलनाची सांगता.
१९५३ – सोविएत रशियाने हैड्रोजन बॉम्बचा स्फोट केला.
१९८० – इटलीतील बोलोन्या शहराच्या रेल्वे स्थानकावर बॉम्बस्फोट. ८५ ठार, २०० जखमी.
१९८५ – डेल्टा एरलाईन्सचे एल.१०११ प्रकारचे विमान अमेरिकेतील डॅलस आंतरराष्ट्रीय विमानतळावर कोसळले. १३७ ठार.
१९९० – इराकने कुवैतवर आक्रमण केले.
२००५ – एअर फ्रांस फ्लाईट ३५८ हे एरबस ए.३०० प्रकारचे विमान कॅनडातील टोरोंटो आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरल्यावर धावपट्टीवरुन घसरले. विमान नष्ट परंतु सर्व प्रवासी बचावले.
२००६ – कॅनडात अँथ्रेक्समुळे ५०० प्राणी ठार झाले.

राष्ट्रीय

१६७७ – छत्रपती शिवाजी महाराज यांनी वृद्धालम् येथे डच प्रतिनिधींशी बोलणी केली.
२००४ – शिबू सोरेन यांचा जामीनअर्ज फेटाळला.
२००४ – एटीपी मास्टर्स स्पर्धेत टोरंटो येथे पेस–भूपती जोडीला विजेतेपद.
२००४ – विश्वनाथ आनंदला डॉर्टमुंट स्पार्कासन स्पर्धेचे अजिंक्यपद.
२००८ – ५ ऑगस्ट रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना ठार मारण्यासंबंधीची धमकी असलेल्या मजकूर आकट या संकेतस्थळावर काही अज्ञात इसमांनी प्रसारीत केल्याचे उघडकीस आल्याने एकच खळबळ उडाली.

जन्म

१६९६ – महमूद पहिला, ओट्टोमन स्म्राट.
१८६८ – कॉन्स्टन्टाईन पहिला, ग्रीसचा राजा.
१८६१ – प्रफुल्लचंद्र रे, भारतीय रसायनशास्त्र.
१९२८ – माल्कम हिल्टन, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९३२ – पीटर ओटूल, आयरिश अभिनेता.
१९५८ – अर्शद अय्युब, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९७६ – मोहम्मद झहीद, पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू.

निधन

६८६ – पोप जॉन पाचवा.
११०० – विल्यम दुसरा, इंग्लंडचा राजा.
१५८९ – हेन्री तिसरा, फ्रांसचा राजा.
१६११ – केटो कियोमासा, जपानी सामुराई.
१९२३ – वॉरेन हार्डिंग, अमेरिकेचा २९वा राष्ट्राध्यक्ष.
२००८ – चेतन दातार, तरुण नाटककार, लेखक आणि दिग्दर्शक.

प्रतिवार्षिक पालन

वायु दल दिन – रशिया.

## शेतरस्तेसंदर्भात धोरणात्मक सुधारणेसाठी महसूलमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत. आ अभिमन्यू पवार यांची सदस्य म्हणून निवड..

औसा – शेतरस्ते संदर्भातील आमदार अभिमन्यू पवार यांच्या लक्षवेधीला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषित केल्याप्रमाणे, शेतरस्त्यांसाठी समर्ग योजना बनवणे व इतर धोरणात्मक सुधारणा सुचविणे साठी, महसूल



चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या समितीवर आमदार अभिमन्यू पवार यांना सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

राज्यातील शेतकऱ्यांसाठी शेतामध्ये पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी इत्यादी कामांसाठी तसेच शेतीमाल बाजारात पोहोचविण्यासाठी वारमाही शेतरस्ते असणे अत्यंत आवश्यक आहे. यांत्रिकीकरणामुळे शेतीतील कामांसाठी यंत्रसामग्रीचा वापर वाढत असल्यामुळे शेतापर्यंत पोहोचण्यासाठी चांगले रस्ते असणे गरजेचे आहे. असे शेतरस्ते हे सामान्यतः रस्ते योजनेत समाविष्ट नसल्यामुळे, त्यांची उपलब्धता आणि गुणवत्ता सुनिश्र्चित करणे आवश्यक आहे. अनेक ठिकाणी शेतरस्ते अतिक्रमित झालेले असून त्यांची गुणवत्ता पुरेशी नसल्याने शेतकऱ्यांची समस्या कायम राहते. या पार्श्र्वभूमीवर, शेत / पाणंद रस्ते अधिक प्रभावीपणे सक्षम होण्याकरिता आणि रस्त्यांची गुणवत्ता सुधारण्याची आवश्यकता आहे.सन २०२५ च्या पावसाळी अधिवेशनात विधानसभा सभागृहात शेत रस्ते व पाणंद/पांदण रस्ते संबंधित आमदार अभिमन्यू पवार यांनी लक्षवेधी मांडली होती .

सदर लक्षवेधी सूचनेच्या वेळी . मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेत/ पाणंद रस्ते यांचे मजवुतीकरण करण्यासंदर्भात समग्र योजना तयार करण्यासाठी महसूलमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात येईल, असे विधानसभा सभागृहास आश्र्वस्त केले आहे. त्यानुसार समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

त्या दुष्टीने हि समिति गठीत करण्यात आली आहे. ही समिती अस्तित्वातील योजनांचा आणि शेतरस्त्यांच्या औसा पॅटर्नचा व राज्यातील इतर यशस्वी पॅटर्नचा अभ्यास करून शेतरस्त्यांसाठी समग्र शेतरस्ते योजनेचा कृती आराखडा तयार करेल, पुढील ५ वर्षांमध्ये शेतरस्त्याचा प्रश्र्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी कृती आराखडा तयार करेल आणि शेतरस्त्यांसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष असावा की विविध लेखाशिर्ष मधून शेतरस्त्यांसाठी निधी आरक्षित करून काम करावे याचा अभ्यासपूर्ण अहवाल शासनाला सादर करेल.

आमदार अभिमन्यू पवार यांनी आपल्या गत पंचवार्षिक कार्यकाळात औसा मतदारसंघात तेराशे किलोमीटर पेक्षा अधिक लाबींचे शेतरस्ते तयार केले आहेत. आमदार फंडातून शेत तिथे रस्ता अभियानाअंतर्गत मतदारसंघातील प्रत्येक शेतकऱ्याला शेतरस्ता देण्यासाठी मोठ्या प्रमाणात अभियान राबविले होते. यामुळे शेतरस्त्याचा औसा पॅटर्न राज्याला दिशादर्शक ठरणारा असून शेतरस्तेसंदर्भात आमदार अभिमन्यू पवार यांनी सरकारकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा करून अनेक धोरणात्मक सुधारणा करून घेतल्या असून हि समिति राज्यातील शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरेल.

## हे औषध आहे मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर, तसेच करते हृदयविकारापासून बचाव

देशभरात मधुमेहाचे प्रमाण महामारीसारखे वाढत आहे. भारतात या आजाराचे १० कोटींहून अधिक रुग्ण आहेत. दरवर्षी रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत असून लहान मुलेही मधुमेहाला बळी पडत आहेत. या रोगासाठी कोणताही विहित उपचार नाही. पण यावर नियंत्रण ठेवता येते. उत्तम जीवनशैली आणि खाण्याच्या सवयींमुळे मधुमेह नियंत्रणात राहतो. मधुमेहाचे रुग्णही अनेक औषधे घेतात. पण एक औषध असे आहे, ज्याचा वापर बहुतेक लोक हृदयाच्या आजारांवर करतात, परंतु ते मधुमेहामध्ये देखील खूप फायदेशीर आहे. आम्ही ॲस्पिरिन औषधाबद्दल बोलत आहोत. मधुमेही रुग्णांसाठीही हे औषध फायदेशीर आहे.

डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, ॲस्पिरिनचा वापर मधुमेहाच्या रुग्णांच्या उपचारात केला जातो. अनेक संशोधनातून असेही समोर आले आहे की याचे सेवन केल्याने रक्तातील साखर नियंत्रणात राहते. टाइप २ मधुमेहाच्या रुग्णांसाठी हे औषध फायदेशीर आहे. ज्यांना आधी हृदयविकाराचा झटका आला आहे आणि आता मधुमेह आहे त्यांच्यासाठीही ॲस्पिरिन फायदेशीर आहे.

याबाबत तज्ञ सांगतात की, ॲस्पिरिन मधुमेहाच्या रुग्णांसाठी खूप फायदेशीर आहे. मधुमेही रुग्णांना हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघाताचा धोका असतो. अशा वेळी या रुग्णांना ॲस्पिरिन दिली जाते.

हृदयविकाराचा झटका आलेल्या मधुमेहाने त्रस्त असलेल्या रुग्णांवरही ॲस्पिरिनचा उपचार केला जातो, जरी या औषधाचा डोस रुग्णाच्या स्थितीनुसार दिला जातो. जास्त डोस घेतल्याने देखील हानी होऊ शकते. अशा स्थितीत मधुमेही रुग्णांना ॲस्पिरिन घेण्याचा सल्ला दिला जातो, परंतु जास्त प्रमाणात घेऊ नका आणि या बाबतीत डॉक्टरांचा सल्ला घ्या.

तज्ञ सांगतात की ॲस्पिरिन हे औषध हृदयविकाराच्या झटक्यापासूनही वाचवते. जर एखाद्या रुग्णाला हृदयविकाराच्या झटक्याने अचानक घाम येणे किंवा छातीत तीव्र वेदना यांसारख्या लक्षणांमुळे त्रस्त असेल, तर त्याने ताबडतोब ॲस्पिरिन घ्यावी. हे औषध शरीरात तयार झालेल्या रक्ताच्या गुठळ्या काढून टाकण्यास मदत करते.

ॲस्पिरिन घेतल्याने हृदयविकाराचा धोका कमी होऊ शकतो. तथापि, जेव्हा तुम्हाला हृदयविकाराची लक्षणे जाणवतात, तेव्हाच हे औषध घ्यावे. विनाकारण औषध घेतल्याने अनेक दुष्परिणाम होऊ शकतात.

## बाभळगाव महाविद्यालयात साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे साहित्यरत्न, लोकशाहीर, कॉम्रेड अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात सांस्कृतिक विभागाच्या वतीने साजरी करण्यात आली. प्रारंभी डॉ. माधव गायकवाड यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी डॉ.मीनाक्षी कोंगे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. पांडुरंग मुंढे यांनी केले. यावेळी डॉ. कोंगे म्हणाल्या, अण्णा भाऊ साठे यांनी कष्टकरी कामगार यांचे जीवन साहित्यामध्ये रेखाटले आहे. त्यांच्या कथा, कादंबऱ्यातून संघर्ष करणाऱ्या नाही का का बघायला मिळतात. संयुक्त महाराष्ट्राचे रोहित त्यांनी लालबावटा या संघटनेच्या माध्यमातून क्रांती घडवून आणली. महाराष्ट्रापासून रशियापर्यंतचा त्यांचा प्रवास प्रेरणादायी असाच झाला आहे. आयुष्याच्या शेवटी ते शारीरिक व्याधीमुळे त्रस्त होते. त्यांचे , माझी मैना गावावर राहिली हे गीत आजही अनेक मराठी माणसाच्या ओठावर रेंगाळते आहे.

शेवटी सर्वांचे आभार प्रा. संतोष कल्याणकर यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंकुश थडकर, दत्ता फुलगामे आणि नितीन पाटील यांनी परिश्रम घेतले.

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शाक्यसंघ माता भीमाई संघटनेची मानवंदना

लातूर : साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांची १०५ वी जयंती



लातूर शहरात उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने शाक्यसंघ माता भीमाई सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी व अधिकारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना पुष्प अर्पण करून मानवंदना दिली.

याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष शाहूराज कांबळे, उपाध्यक्ष दिलीप कांबळे, कोषाध्यक्ष रोहिदास सोनकांबळे, सचिव शिवाजी कांबळे. सल्लागार त्र्यंबक कवठेकर, शंकर शिंदे, सदस्य अंगद कांबळे, अशोक कांबळे, मोहन कांबळे, जालिंदर कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# स्वतंत्र समता शिक्षक संघाचे आमरण उपोषण स्थगित.

विशेष प्रतिनिधी वर्धा– जि.प.शिक्षकांमधून केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी पदावर पदोन्नती करण्यात यावी या एकमेव मागणीसाठी स्वतंत्र समता शिक्षक संघाने निवेदन व चर्चेद्वारे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान तसेच तत्कालीन शिक्षणाधिकारी डॉ. नितु गावंडे व डॉ.धर्मपाल कुमरे यांच्याशी पाठपुरावा करण्यात आला होता.परंतु कार्यालयाच्या कामात गती मिळाली नाही. दि.१० जूनला नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन व नवनियुक्त शिक्षणाधिकारी डॉ.महेंद्र गजभिये यांच्याशी चर्चा करून उपोषणाचा इशारा देण्यात आला होता. तरीसुद्धा पदोन्नतीच्या कामात अपेक्षित वेग आला नव्हता.एक महिन्यानंतर निवडणूक व आचारसेहिता तसेच जनगणनेच्या कामामुळे आतासुद्धा पदोन्नती मिळणार नाही अशी शिक्षकांमध्ये भीती निर्माण झाली होती.परिणामी प्रशासनाच्या चालढकलपणामुळे अनेक शिक्षक पदोन्नती न होता सेवानिवृत्त झाले असते.



त्यामुळे मंगळवार दि. २९ जून या नागपंचमीच्या सणापासून स्वतंत्र समता शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष गौतम पाटील यांचे नेतृत्वात आमरण उपोषण व दररोज पाच शिक्षक साखळी उपोषणाला बसले होते.यादरम्यान सचिन शंभरकर यांचे नेतृत्वात स्वतंत्र समता शिक्षक संघाचे तर लोमेश वराडे यांचे नेतृत्वात प्राथमिक शिक्षक संघाचे शिष्टमंडळ शिक्षणाधिकारी यांच्याशी भेटून उपोषणाची गांभीर्यता निदर्शनास आणून दिली. त्यामुळे उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी शिक्षणाधिकारी डॉ.महेंद्र गजभिये व संबंधित लिपिक यांनी उपोषणकर्ते गौतम पाटील,राज्य अध्यक्ष सुनील तेलतुंबडे व सचिन शंभरकर तसेच संघटनेचे मार्गदर्शक सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी धनराज तेलंग यांच्यासोबत पदोन्नतीच्या प्रक्रियेबाबत चर्चा केली.शिक्षण विस्ताराधिकाऱ्याच्या सात पदोन्नतीमध्ये दिव्यांगांना सामावून घ्यायचे असल्याने सन २०१६ पासून रोस्टर तपासण्यास व आक्षेपास दहा दिवसाच्या कालावधीवर सहमती झाली.

याप्रमाणे आठ ऑगस्टपर्यंत शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे आदेश काढण्याचे लेखी आश्र्वासन प्राप्त झाले. तसेच केंद्रप्रमुखांच्या नवीन अध्यादेशामुळे प्रक्रियेला गती देऊन २९ ऑगस्टला पदोन्नतीचे आदेश शिक्षकांना देण्यात येणार असल्याचे लेखी आश्र्वासन उपोषणकर्त्यांनी घेतले.त्यानंतरच आमरण उपोषण पुढील एक महिन्यासाठी स्थगित केल्याची घोषणा केली.शिक्षणाधिकारी डॉ.गजभिये यांनी गौतम पाटील यांना ज्यूस पाजून उपोषण स्थगित केले. उपोषणाला वेळोवेळी बळ देण्यासाठी लोमेश वऱ्हाडे व अरुण झोटिंग यांचा प्राथमिक शिक्षक संघ,प्रफुल कांबळे व प्रमोद खोडे यांची जुनी पेन्शन हक्क संघटना,रवींद्र खेडकर व अजय इंगोले यांची पदवीधर संघटना,रमेश वानखेडे व आम्रपाल कांबळे यांची कास्ट्राईब कर्मचारी संघटना,जानराव ठोंबरे व सुधाकर जुनघरे यांची बामसेफ संघटना,डॉ.गोपाल थुल व माणिक कांबळे यांची जेष्ठ नागरिक संघटना, राजू थुल व राजेंद्र भोयर यांच्या नेतृत्वातील सेवानिवृत्त संघटना,माया चापले व रवींद्र इखार यांच्या नेतृत्वातील अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघटना,ललित बरसागडे यांच्या शिक्षण विस्तार अधिकारी संघटनांचा पाठिंबा मिळाला.तसेच साखळी उपोषणाला बसलेले सचिन शंभरकर,गौतम वासे,रवींद्र खेडकर, सुनील तेलतुंबडे,गौतम सोनटक्के,संजय मून,गंगाधर भगत,पुष्पराज झिलटे,प्रयोग तेलंग,गोपाल ताजने,घनश्याम थुल,नरेश नगराळे,दिलीप वावरे,महेंद्र आडे,प्रकाश पखाले,संजय गावंडे इत्यादींचे सहकार्य मिळाले.

गौतम पाटील– ९४२३१२०४५९,
अध्यक्ष स्वतंत्र समता शिक्षक संघ

# पत्रकार कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद, सकारात्मक पत्रकारितेमुळे समाजाला योग्य दिशा - पोलीस अधीक्षक अमोल तांबे

लातूर, (जिमाका): सकारात्मक आणि वस्तुनिष्ठ पत्रकारिता ही सदृढ लोकशाहीचा आधारस्तंभ आहे. सकारात्मक पत्रकारितेमुळे समाजाला योग्य दिशा मिळते आणि सामाजिक विकासाला गती प्राप्त होते, असे मत पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी व्यक्त केले. लातूर येथील डॉ. भालचंद्र रक्तपेढी सभागृहात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयांतर्गत लातूर विभागीय माहिती कार्यालय आणि जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पत्रकार कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



या कार्यशाळेला प्रभारी विभागीय माहिती उपसंचालक विवेक खडसे, मराठी भाषा तज्ज्ञ प्रा. दीपक रंगारी, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी पुरुषोत्तम रुकमे, विभागीय माहिती कार्यालयाचे सहायक संचालक डॉ. श्याम टरके, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप यांच्यासह जिल्ह्यातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते आद्यपत्रकार बाळशास्त्री जांभेकर, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले.

सदृढ लोकशाहीसाठी प्रसारमाध्यमे, शासन, प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वय आवश्यक आहे. प्रसारमाध्यमे समाजाला मार्गदर्शन करतात. नवमाध्यमे आणि समाजमाध्यमांचा वाढता प्रभाव लक्षात घेता, सत्य आणि अचूक माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी प्रसारमाध्यमांवर आहे. तसेच, नागरिकांना त्यांच्या कर्तव्यांबाबत जागरूक करण्याचे महत्त्वाचे कार्यही माध्यमांनी करणे आवश्यक आहे, असे पोलीस अधीक्षक श्री. तांबे यावेळी म्हणाले. पत्रकारांसाठी असलेल्या शासकीय योजना, सवलती आणि सुविधांबाबत माहिती मिळवून त्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रभारी विभागीय माहिती उपसंचालक विवेक खडसे यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना कार्यशाळा आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला. पत्रकारांना शासकीय योजनांची माहिती देणे, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता आणि वृत्त संकलन–संपादन यांबाबत मार्गदर्शन करणे हा या कार्यशाळेचा मुख्य हेतू होता, असे त्यांनी सांगितले.

विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

मराठी भाषा तज्ज्ञ प्रा. दीपक रंगारी यांनी वृत्त संकलन आणि संपादनात शुद्धलेखनाचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. मराठी प्रमाणभाषेचे नियम, शब्दांचा अर्थ, व्याकरणाचा योग्य वापर, तसेच मराठी भाषेच्या समृद्धीतील साहित्यिकांचे योगदान याविषयी त्यांनी माहिती दिली. क्रियापदे, शब्दयोगी अव्यय, ऱ्हस्व–दीर्घ उच्चार, तत्सम–तद्भव शब्दांचे नियम उदाहरणांसह समजावून सांगितले. पत्रकारांनी शब्दकोश आणि लेखनकोश यांचा वापर करून अचूक लेखन करावे, असे आवाहन त्यांनी केले. शब्दांचा वाक्यरचनेनुसार आणि संदर्भानुसार होणारा बदलही त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केला.

विभागीय माहिती कार्यालयाचे सहायक संचालक डॉ. श्याम टरके यांनी पत्रकारांसाठीच्या अधिस्वीकृती नियमावली, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना आणि शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी याविषयी सविस्तर माहिती दिली.

जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी पुरुषोत्तम रुकमे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा पत्रकारितेतील वापर, भाषा, कला, शास्त्र, संस्कृती यांच्याशी संबंध, तसेच राष्ट्रीय आणि प्रादेशिक वृत्तपत्रांमधील सध्याच्या एआय ॲप्सच्या वापराबाबत माहिती दिली.

या कार्यशाळेला जिल्ह्यातील विविध पत्रकार संघटनांचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेचे सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले, विभागीय माहिती कार्यालयाच्या उपसंपादक रेखा पालवे–गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## ‘राजमाता जिजामाता’त अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळकाना अभिवादन

लातूर,– येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेज, तुळजाभवानी विद्यालय व संगमेश्वर विद्यालयात शुक्रवारी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

प्रारंभी संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, करिष्मा केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, शैक्षणिक समन्वयक राजीव मुंढे, राणी केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी, लोकमान्य टिळकांची देशभक्ती आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची सामाजिक जाणीव व संघर्ष हे गुण विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत, असे आवाहन केले. यावेळी संकुलातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## अण्णाभाऊ साठे यांच्या ज़यंती निमित्त धिरज विलासराव देशमुख यांचे कडून अभिवादन.

लातूर:–– मानवतावादी आणि शोषणमुक्त समाज निर्माण व्हावा, हे ध्येय बाळगून तळागाळातील शोषित समूहांचे जगणे शब्दबध्द करणारे थोर साहित्यसम्राट, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित अभिवादन कार्यक्रमास उपस्थित राहून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास माजी आमदार तथा लातूर जिल्हा बँक अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले तसेच प्रभाग १ मध्ये आयोजित अभिवादन कार्यक्रमास उपस्थित राहून साहीत्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंखे, शहर अध्यक्ष किरण जाधव, संतोष देशमुख, डॉ दिनेश नवगिरे, कैलास कांबळे, जिवन सुरवसे, प्रविण पाटील,मोहन माने,गोपाळ बुरबुरे,आशिष चिकटे, चंद्रकांत चिकटे, मोहन सुरवसे, प्रविण सुर्यवंशी समद पटेल आदींची उपस्थिती होती.



## राशीभविष्य २ ऑगस्ट २०२५

मेष: शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर
नातेवाईकांशी असलेल्या संबंधात मर्यादा राखा. व्यापारात नवीन संधी मिळतील. आर्थिक उत्पन्नात वाढ होईल. कौटुंबिक समस्या दूर होईल.

वृषभ:शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पश्चिम
बौद्धीक अडचणी दूर होतील. प्रगतीचे मार्ग मोकळे होतील. फायदेशीर प्रवास होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील वयस्कर व्यक्तींच्या प्रकृतीची काळजी घ्या. व्यावसायामधील वादापासून दूर रहा.

मिथून:शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर
वैवाहिक जीवन आनंदी राहिल्याने कामात उत्साह राहिल. आरोग्याच्या समस्या दूर होतील. निर्णय घेण्यात उशीर करु नका. व्यापारात नवीन योजनांचा फायदा होईल.

कर्क :शुभ रंग:काळा, शुभ दिशा: पश्चिम
नवीन कामाचे प्रस्ताव मिळतील. योजना कार्यान्वित होतील. आर्थिक फायदाहोण्याचे योग आहेत. जमीन–जूमल्याच्या कामात फायदा होण्याची शक्यता आहे. विरोध आणि तनावापासून दूर रहा.

सिंह :शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
संपत्ती संबंधात केलेली धावपळ फायदेशीर ठरेल. स्पर्धेत यश मिळेल. आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे योग आहेत. जोखमीच्या कामांपासून दूर रहा.

कन्या :शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पूर्व
वादविवाद संपुष्टात येतील. नौकरी करणाऱ्यांना मनासारखी बढती, बदली होण्याची शक्यता आहे. सामाजिक कार्य करीत असल्यामुळे मान सन्मान मिळेल.

तुळ: शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण
कौटुंबिक समस्यामध्ये लक्ष राहणार नाही. अनिश्चितेमुळे वैचारिक धाडसामध्ये कमतरता राहील. व्यापारात कोणावरही विश्वास दाखवू नका. कर्ज घेण्याची वेळ येऊ शकते.

वृश्चिक: शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: दक्षिण
रचनात्मक कामात यश मिळेल. आर्थिक योग उत्तम आहे. कुटुंबातील व्यत्तिंच्े सहकार्य घ्या. प्रभावी वातावरणाचा उपयोग होईल. अती उत्साहीपणा दाखवू नका.

धनु: शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर
आपले प्रयत्न आज सफल होतील. व्यापारात योग्यवेळी घेतलेला निर्णय फायदेशीर राहील. शिक्षणात यश मिळेल. वेळेचा दुरूपयोग करू नका.

मकर : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व
मुलाकडून आनंदी बातमीमिळेल. कार्यसिद्धि झाल्याने आर्थिक क्षेत्रात आशाजनक बदल घडून येतील. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. प्रवासात सावधगिरी बाळगा.

कुंभ: शुभ रंग: हिरवा: शुभ दिशा:पश्चिम
बुद्धिमत्ता आणि दूरदृष्टिपणाचे समाजात कौतुक होईल. सुखवस्तूंवर खर्च होईल. मुलांची काळजी राहू शकते. व्यापार फायदेशीर राहिल. संताची भेट होईल.

मीन : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पूर्व
कायदेशीर कामे पूर्ण होतील.अभ्यासात मन रमेल. कामातील विस्तार फायदेशीर ठरेल. रागावर नियंत्रणठेवा. वैवाहिक जीवन सुखी राहिल.

## उपदेशकथा
## निरपेक्षी–सदासुखी !

जगज्जेता सिकंदर (अलेक्झांडर) बादशहाच्या समकालीन असणाऱ्या डायोजिनीस या ग्रीक तत्त्वचिंतकाची ही गोष्ट. तो निसर्गापासून धडा घेणारा मुनीच होता. ‘माणसाने कमीत कमी गरजा ठेवाव्यात, म्हणजे तो सुखी होतो’ असे त्याचे तत्त्व होते. कुत्रा कसा मनमुराद भटकतो, मिळेल ते खातो, ना घर ना दार, ना कपडा ना लत्ता; तसेच माणसाने राहावे असे तो सांगायचा म्हणून त्याच्या पंथाला उपहासाने ‘सिनीक’ (कुत्र्यांचा) पंथ म्हणू लागले. त्याच्या निधनानंतर नागरिकांनी त्याच्या कबरीवर कुत्र्याचीच प्रतिमा बसवली. फक्त तो एक सोटा जवळ बाळगत असे नि कमरेस पंचा. पाणीसुद्धा ओंजळीने प्यायचा. तो दिवसासुद्धा हाती पलिता घेऊन फिरायचा नि कुणी विचारले तर सांगायचा, ‘सच्चा माणसाच्या शोधासाठी हा दिवा घेऊन फिरतो आहे’ सिकंदर बादशहा त्याची कीर्ती ऐकून भेटायला आला. ‘मी बादशहा सिकंदर, हवं ते माग, मी देईन’ असे त्याने सांगितले. डायोजिनीस म्हणाला, ‘माझं ऊन अडवून उभा आहेस तेवढा बाजूला उभा राहा. मला दुसरं काही नको.’

कथा उपदेश : नि:स्पृहाला जग तृणवत् वाटते.

## (गुरु वचन)
## विश्वासघात म्हणजे आत्मघात

गुरू हरगोविंदसिंहजी यांच्या अत्यंत निकटवर्तियांपैकी एक म्हणजे पाइंदे खाँ. गुरुंना त्याच्यावर स्वत::पेक्षा जास्त विश्वास होता. त्याचे कतृर्त्व, त्याचे शौर्य या साऱ्यांवर गुरुजींचा अत्यंत विश्वास होता. परंतु पाइंदे खाँने याचा वेगळा अर्थ काढला आणि तो शिष्यांमध्ये गुरुजींचीच बदनामी करू लागला.

शिष्यांनी त्याला खूप समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्याचा काहीच परिणाम झाला नाही. तो कोणाचेच ऐकत नव्हता. शिष्यांनी गुरुजींनाही त्याच्या या गोष्टी सांगितल्या होत्या. गुरुजी मात्र शांत असल्याने शिष्यांना याचेही आश्चर्य वाटत होते. त्यांना कळतच नव्हते, की गुरुजींना अचानक काय झाले, पाइंदे खाँ गुरुजींच्या इतक्या जवळचा आणि तोच त्यांची बदनामी करतोय?

शेवटी गुरुजींच्या सहनशीलतेचा अंत झाला आणि त्यांनी घोषणा केली, की पाइंदे खाँला दरबारातून काढून टाकावे. यानंतर पाइंदे खाँने बंडखोरी केली आणि तो मोगलांना जाऊन मिळाला. त्याने गुरुजींना जाताना धमकीही दिली ’तुम्ही मोगलांपुढे टिकूच शकणार नाहीत’ गुरुजी शांत होते त्यांनी त्याची हकालपट्टी केली.

यानंतर पाइंदे खाँ थेट शहाजानला जाऊन भेटला आणि त्याने हरगोविंदसिंहजी विरोधात त्याचे कान भरले. शहाजहानने मग काले खाँच्या नेतृत्वाखाली एक फौज गुरुंवर हल्ला करण्यासाठी पाठवली. जालंधरमध्ये मोगल आणि शीख सैन्याचे युद्ध झाले.

या युद्धात पाइंदे खाँ ने गुरुंवर हल्ला चढवण्याचा प्रयत्न केला. गुरुंनी त्याचे वार चुकवत त्याला माफी मागायला सांगितली आणि असे केले तर, मी तुला माफ करेन असे आश्वासनही त्याला दिले. परंतु तो ऐकण्याच्या परिस्थितीत नव्हता, त्याला झालेल्या गर्वाने त्याच्या मेंदूवर ताबा मिळवला होता. त्याने पुन्हा गुरुजींवर हल्ला चढवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याच्या फारसा परिणाम झाला नाही.

गुरुजींनी त्याचा हाही वार चुकवला. त्याला पुन्हा शरण येण्याचे आवाहन केले. परंतु तो ऐकण्यास तयार नव्हता. शेवटी गुरुजींना त्याचा वध करावाच लागला. इकडे मोगल सैन्याचेही बारा वाजले. त्यांचाही पराभव झाला. आणि काले खाँ आल्या पावली पळत सुटला.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894